राज्य निवडणूक आयुक्त यांना
सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक :रानिआ-२०१०/४०२/(प्र.क्र.९९/१०) का. ३७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० सप्टेंबर, २०११.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय, क्र. रानिआ-२००९/३०९/प्र.क्र.४८/०९/३७, दि. ९.१० २००९
२) शासन शुध्दीपत्र क्र. रानिआ-२००९/३०९/प्र.क्र.४८/०९/३७, दि. १७.११.२००९
३) शासन निर्णय, क्र. रानिआ-२०१०/४०२/प्र.क्र.९९/१०/३७, दि. ९.५.२०११
४) शासन निर्णय, क्र. रानिआ-२०११/प्र.क्र.५६/का.३७, दि. ३०.०८.२०११

**प्रस्तावना :-**

राज्य निवडणूक आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यासाठी व या पदाशी संबंधित अनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ पारित करण्यात आलेला आहे. या अधिनियमामध्ये राज्य निवडणूक आयुक्त पदाचा कालावधी, पदधारकास द्यावयाचे वेतन, रजा इ. बाबत विशिष्ट तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच महागाई भत्ता (निवृत्ती वेतनासह) स्थानिक पूरक भत्ता तसेच प्रवास भत्ता, भाडेमाफ निवास व्यवस्था, वैद्यकीय सुविधा व इतर सेवा शर्तीबाबतची तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम १० मध्ये असून त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या सदस्यांना लागू असणाऱ्या उपरोक्त सेवा शर्ती या शक्यतोवर राज्य निवडणूक आयुक्तांना देखील लागू होतील. सदर तरतूदींच्या आधारे संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, राज्य निवडणूक आयुक्तांना आतिथ्य भत्ता, शासकीय वाहनाकरीता दरमहा २०० लि. पेट्रोल मर्यादा, भाडेमाफ निवास व्यवस्था व रजा प्रवास सवलत अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. राज्य निवडणूक आयुक्तांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या सदस्यांप्रमाणे सेवा शर्ती लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. त्यास अनुसरून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

**शासन निर्णय :-**

राज्य निवडणूक आयुक्त, महराष्ट्र यांना, राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ मधील कलम १० अन्वये, अनुज्ञेय असलेल्या अन्य सेवा शर्ती या महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या सदस्यांप्रमाणेच अनुज्ञेय असतील.

२. हा शासन निर्णय या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. याकरिता होणारा खर्च प्रधान शीर्ष २०७०-इतर प्रशासनिक सेवा-०० ८०० इतर खर्च (००) (०८) राज्य निवडणूक आयोग-(०१)-वेतन (२०७० ०६४८) या लेखा शीर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(अ. र. पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
२) मा. मुख्य सचिव
३) अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
४) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
५) सर्व अपर मुख्य सचिव, संबंधित मंत्रालयीन विभाग,
६) सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई,
८) महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र (१), मुंबई,
९) अधिदान व लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे कार्यालय, मुंबई,
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
११) वित्त विभाग, अर्थसंकल्प-१३/ व्यय-४, मंत्रालय, मुंबई,
१२) निवड नस्ती

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

**No. WRP 1010 / 676 / XXX**
General Administration Department,
Mantralaya, Mumbai - 400 032
**Dated:** 12th September 2011

To,
**The Secretary to the Government of India,**
Ministry of Home Affairs,
North Block,
New Delhi.

Sir,

The Government of Maharashtra has taken a decision to position the State Election Commissioner of Maharashtra immediately after the High Court Judges of the Mumbai High Court for all State and Ceremonial functions held in Maharashtra, and seating arrangements during such functions are made accordingly.

As the Judges of the Mumbai High Court figure at Article 17 in the Table of Precedence issued by the Government of India, I am directed to request you to include the 'State Election Commissioner of Maharashtra' at Article 17A in the said Table of Precedence.

Yours faithfully,

12/9/11

(S. V. Bijoor)
Joint Secretary & Joint Chief Protocol Officer
Tel. 022 – 22023132
Fax: 022 – 22822626

Copy forwarded for information and necessary action to:
The Deputy Secretary, GAD (Desk 37), Mantralaya, Mumbai